Date: 19/08/2023

To,
**BSE Ltd**
Phiroze Jeejeebhoy Tower,
Dalal Street Fort,
Mumbai – 400001

**Scrip code: 514330/Scrip ID: ONEGLOBAL**

**Subject: Intimation under Regulation 30 and Regulation 47 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015**

Dear Sir/Ma'am,

With reference to the subject referred Regulation, we would like to inform you that the Notice of 31st Annual General Meeting has been published in The Business Standard Newspaper in English & Tarun Bharat Newspaper in Marathi on 19th August, 2023. A copy of the said newspaper advertisements are enclosed for your reference & record.

Please take note of the following

**For ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED**

SANJAY LALBHADUR UPADHAYA
Digitally signed by SANJAY LALBHADUR UPADHAYA
Date: 2023.08.19 12:44:13 +05'30'

**Sanjay Lalbhadur Upadhaya**
**Managing Director**
**DIN: 07497306**

**Place: Mumbai**

**ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED**
*(Formerly known as Overseas Synthetics Limited)*
CIN : L74110MH1992PLC367633
Telephone : 8657527323 Website : www.1gsp.in E-mail : 1connect@1gsp.in
Registered Address : 1205-1206, 12th Floor, Raheja Chambers, 213, Free Press Journal Marg, Nariman Point, Mumbai 400021.




# मुंबई विद्यापीठाची पदवीधर सिनेट निवडणूक स्थगित!

**मुंबई विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाचा सिनेट निवडणूक कार्यक्रम शासनाकडून स्थगित करण्यात आला असून, शासनाने याबाबत अधिकृत परिपत्रक जारी केले आहे. मुंबई विद्यापीठ सिनेट निवडणूक उमेदवार अर्ज भरण्याची अंतिम मुदत शुक्रवार, १८ ऑगस्ट होती. जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दि. १० सप्टेंबर रोजी मतदान होणार होते. दि. १३ सप्टेंबरला या निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाणार होता. मात्र, अचानक या सिनेट निवडणुकीच्या कार्यक्रमाला स्थगिती देण्यात आली आहे. या स्थगितीचे कारण अजूनही गुलदस्त्यात आहे. दरम्यान, या स्थगितीवर विद्यार्थी-युवक संघटनांकडून टीका करण्यात येत आहे.**

## विद्यापीठाला उशिरा सूचलेले शहाणपण : विद्यापीठ विकास मंच

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

मुंबई अधिसभा निवडणुकीच्याबाबत मुंबई विद्यापीठाने जाहीर केलेला कार्यक्रम स्थगित केला असून, पारदर्शक पद्धतीने निवडणूक पार पाडण्यासाठी विद्यापीठाला उशिरा का होईना सूचलेले शहाणपण आहे, असे मत विद्यापीठ विकास मंचने व्यक्त केले आहे.

विद्यापीठ विकास मंचने यासंदर्भात मागणी केली आहे की, ''सदर मतदार यादीची सखोल पडताळणी करून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करावी. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आधार कार्ड तसेच पदवी प्रमाणपत्राची सत्यता पडताळावी. तसेच, या सर्व प्रकाराची उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी करुन पुन्हा निवडणूक कार्यक्रम जाहीर करावा.''

''विद्यापीठ विकास मंचाने या निवडणुकीची सर्व तयारी केली असून, सर्व दहापैकी दहा जागांवर उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. विद्यापीठाच्या व्यापक हिताच्या अजेंडा घेऊन विद्यापीठ विकास मंच या निवडणुकीला सामोरे जात असून, या निवडणुकीत आम्ही नक्कीच घवघवीत यश प्राप्त करू,'' असा विश्वास विद्यापीठ विकास मंचाचे निमंत्रक चंद्रगुप्त (हर्षद) भिडे व अभाविप कोकण प्रदेशमंत्री अमित ढोमसे यांनी व्यक्त केले.

### बोगस मतदार नोंदणीची चौकशी व्हावी



“बोगस मतदारांना घुसवून मुंबई विद्यापीठाला बदनाम करण्याचे काम आदित्य ठाकरेंनी केले आहे. बोगस नावांची चौकशी व्हायला पाहिजे. बोगस नावे डिलीट करून आमच्याशी सामना करावा. सिनेट निवडणूक प्रामाणिकपणे झाल्यास आम्ही उबाठा गटाच्या चारी मुंड्या चीत करू.

– **आ. ॲड. आशिष शेलार,** अध्यक्ष, मुंबई भाजप

### बोगस नावांतून वर्चस्व निर्माण करण्याचा डाव




“गेल्या वेळी सिनेट निवडणुका झाल्या, त्यात बोगस मतदान झाले होते. यावेळीही अशा प्रकारची बोगस नावे आणण्याचा प्रयत्न करून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा काहींचा छुपा डाव होता. तो डाव उद्ध्वस्त झाला, त्यामुळे वैफल्यग्रस्त होत काहीजण वक्तव्य करत आहेत.

– **आ. प्रवीण दरेकर,** गटनेते, विधान परिषद

### आधीच व्यक्त करण्यात आली होती साशंकता

मुंबई विद्यापीठाने पदवीधर निवडणूक तात्पुरती मतदार यादी दि. १८ मे रोजी प्रसिद्ध केली, यामध्ये एकूण १ लाख, १३ हजार मतदारांपैकी ७२ हजार मतदार वैध ठरवले व इतर ४० हजार मतदारांना अपिल करण्यासाठी वेळ देण्यात आला होता. या अपिलनंतर मुंबई विद्यापीठाने अंतिम ९४ हजार मतदारांची यादी प्रसिद्ध केली. या ९४ हजार मतदार यादीचा सखोल अभ्यास केल्यानंतर यामध्ये अनेक गडबड गोंधळ जाणवून आला व ही मतदार यादी सदोष असून, याबाबत सर्व पडताळणी केल्याशिवाय निवडणूक कार्यक्रम जाहीर करू नये, याबाबत दि. १ ऑगस्ट रोजीच विद्यापीठ विकास मंचाने विद्यापीठाला अवगत करून दिले होते. या सर्व प्रकाराची माहिती राज्यपाल यांनादेखील ई-मेलच्या माध्यमातून कळविण्यात आली होती. तसेच, याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनादेखील अवगत करण्यात आले होते. त्यानंतर या प्रकाराची सखोल चौकशी झाल्याशिवाय निवडणूक कार्यक्रम जाहीर करू नये, याबाबतसुद्धा पत्र देण्यात आले होते. परंतु, विद्यापीठाच्या निष्काळजीपणामुळे यामध्ये राज्य सरकारला हस्तक्षेप करावा लागला.



“महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आणि मुंबई विद्यापीठाचे पदसिद्ध कुलपती म्हणून रमेश बैस यांनी या अतिसंवेदनशील प्रकरणात जातीने लक्ष घालावे आणि सिनेट निवडणूक नेमक्या कोणत्या कारणाने 'रातोरात' रद्द करण्यात आली, हे स्पष्ट करावे, हीच आग्रहाची मागणी. विद्यापीठ प्रशासन नेमकं कुणाला घाबरतंय?

– **अमित ठाकरे,** अध्यक्ष, मनविसे



“सव्वा लाख मतदारांनी २० रुपये भरून नोंदणी केली. यानंतर तीन महिने त्यांची तपासणी होऊन यादी तयार झाली. त्यानंतरही कोणतीही हिंसाचार किंवा वादाची घटना नसताना मुंबई विद्यापीठाने सिनेट निवडणूक रद्द केली. ही निवडणूक युवासेना मोठ्या फरकाने जिंकणार होती, म्हणूनच सत्ताधाऱ्यांनी निवडणूक स्थगित केली.

– **आदित्य ठाकरे,** युवासेनाध्यक्ष



▶ **मुंबई :** वामन हरी पेठे ज्वेलर्स शाखा, गिरगाव संस्थेच्या ११४व्या वर्धापन दिनानिमित्त संस्थेचे मालक प्रकाश शंकर पेठे यांनी 'दि दांगट न्यूजपेपर एजन्सी'चे मालक बाजीराव दांगट व रंजना दांगट यांना खास निमंत्रित करुन त्यांच्या हस्ते केक कापून संस्थेचा ११४वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी सर्वश्री रमेश नवले, प्रकाश वीर, दत्ताराम रामगडे, किरण वागडे, आशा दिगास्कर आदी मान्यवर उपस्थित होते.

## केरळच्या राज्यपालांचे शंकर ठक्कर यांनी केले स्वागत

**मुंबई :** केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान, जे 'समान नागरी संहिता' (युसीसी) बद्दलच्या आपल्या मतांचे समर्थन करण्यासाठी नुकतेच मुंबईत आले होते, त्यांना देशातील आठ कोटी व्यापाऱ्यांच्यावतीने भारतीय संस्कृतीनुसार हार घालण्यात आला आणि 'अखिल भारतीय खाद्यतेल व्यापारी महासंघा'चे (एआयईओटीएफ) राष्ट्रीय अध्यक्ष आणि 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स'चे (कॅट) महाराष्ट्र राज्य सरचिटणीस शंकर ठक्कर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी दोन्ही संघटनांतर्फे देशभरात चालवल्या जाणाऱ्या उपक्रमांबद्दल, विशेषतः देशभक्तीप्रणित 'मेरी माटी' अभियानाविषयी चर्चा करण्यात आली. चीनने उत्पादित केलेल्या वस्तूंवर बहिष्कार घालण्यासाठी आणि देशातील व्यापारी आणि नागरिकांना डिजिटल करण्यासाठी नुकत्याच सुरू केलेल्या 'नॅशनल डिजिटल सिटीझन फोरम'सारख्या कार्यक्रमांची माहिती यावेळी दिली गेली. राज्यपालांनीही यावेळी शंकर ठक्कर यांना शुभेच्छा दिल्या.



## उद्या रंगणार पहिला 'महाराष्ट्र उद्योग पुरस्कार' सोहळा

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या नामवंत उद्योजकांना 'महाराष्ट्र भूषण पुरस्कारा'च्या धर्तीवर या वर्षीपासून राज्य शासनाने 'महाराष्ट्र उद्योग पुरस्कार' देऊन त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षीचे उद्योग पुरस्कार जाहीर झाले असून, पहिला 'उद्योगरत्न पुरस्कार' पद्मविभूषण रतन टाटा यांना तर 'उद्योगमित्र पुरस्कार' आदर पुनावाला यांना तसेच 'उद्योगिनी पुरस्कार' गौरी किर्लोस्कर यांना, तर 'उत्कृष्ट मराठी उद्योजक पुरस्कार' विलास शिंदे यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार प्रदान सोहळा रविवार, दि. २० ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता वांद्रे, कुर्ला संकुलमधील जियो वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमधील जास्मिन सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याला राज्यपाल रमेश बैस हे प्रमुख अतिथी असतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अध्यक्षस्थानी असणाऱ्या या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य विकास, उद्योजकता व नावीन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा, उद्योगमंत्री उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती असेल.

## बचतगटांना मिळणार व्यवसायासाठी हक्काचे व्यासपीठ

### मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते आज आठवडी बाजाराचे उद्घाटन



**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

मुंबई उपनगर जिल्ह्यात 'जनता दरबार उपक्रमां'तर्गत महिला बचत गटांच्या व्यवसाय विषयक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींमार्फत महिला बचतगटांना त्यांच्या वस्तू विकण्यासाठी जागेची गरज असल्याचे समजले. मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या महिला बचत गटांना व्यवसायासाठी हक्काची जागा मिळावी, या उद्देशाने 'आठवडी बाजार' आयोजित करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार महापालिकेच्या 'एन' विभागाच्यावतीने प्रथमच शनिवार, दि. १९ ऑगस्ट रोजी आठवडी बाजार आयोजित करण्यात येणार आहे. मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते या आठवडी बाजाराचे उद्घाटन करण्यात येईल. घाटकोपर पूर्व येथील पटेल चौकातल्या सुविधा बिझनेस पार्कच्या दुसऱ्या मजल्यावरील पार्किंग लॉटमध्ये दि. १९ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते रात्री ९ आणि रविवार, दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत या आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले आहे.

या आठवडी बाजाराच्या माध्यमातून दर आठवड्याला नोंदणी केलेल्या ५० महिला बचतगटांना आपल्या वस्तू विकण्यासाठी महापालिकेतर्फे हक्काची जागा मिळेल. या जागेसाठी बचतगटांना कोणत्याही प्रकारचे शुल्क द्यावे लागणार नाही. तसेच, कार्यक्रमाच्या आयोजनाची आणि जागा उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी महापालिकेतर्फे पूर्ण करण्यात येईल. या कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार महापालिकेतर्फे करण्यात येईल, जेणेकरून महिला व्यावसायिकांना अधिक ग्राहक उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे स्थानिक परिसरातील व्यापारी वर्गालादेखील आठवडी बाजारासाठी निमंत्रित करून महिला बचतगटांशी जोडण्याचा शासनाचा मानस आहे, जेणेकरून महिलांना आर्थिक विकासाच्या अधिक संधी प्राप्त होतील.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION TO SRM RE-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification:

| | |
|---|---|
| **Tender No.:** RE-Tender-29/2023-24<br>**Name of Tender: Extension to** RE-Tender for "Providing and Fixing of 01 Nos. of 1 Core 630 sq.mm XLPE Power Aluminium Armored Cable from 50MVA, 220/22KV Power Transformer No. 03 LV Bus Structure to PTR 1 LV Bus-1 at 220KV Kolshet Substation" under (O&M) Dn., Bhandup.<br>**Tender Fee:** Rs. 500/- + applicable GST<br>**RFx No. : 7000027933** | **Online Downloading of the RFx:** 19.08.2023,10:00 Hrs to 26.08.2023,10:00 Hrs<br>**Online Submission of the RFx:** On or Before 26.08.2023, 10:00 Hrs.<br>**Online Opening of the Techno-Commercial RFx:** 26.08.2023 at 11:00 Hrs (If possible).<br>**Online Opening of the Price Bid:** 26.08.2023 at 12:00 Hrs (If possible). |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Assistant Engineer (O) & Mobile No. 9096444992
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Division, Bhandup

**जाहीर आवाहन**

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत राष्ट्रीय बाल पुरस्कार-२०२४

**बाल शक्ती पुरस्कार व बाल कल्याण पुरस्कार बाबत**

बाल शक्ती पुरस्कार ज्या मुलांनी (वय ५ पेक्षा अधिक व १८ वर्षापर्यंतच्या) शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविण्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेली आहे. त्यांना हा पुरस्कार दिला जातो.

**बाल कल्याण पुरस्कार –**

१. **वैयक्तिक पुरस्कार – मुलांच्या विकास, संरक्षण व कल्याण या क्षेत्रांत कोणत्याही प्रकारचे वेतन अथवा मानधन न घेता मानवसेवी उदात्त भावनेतून किमान ७ वर्षे काम करणाऱ्या व्यक्तिस हा पुरस्कार दिला जातो.**

२. **संस्था स्तरावर – बाल कल्याण क्षेत्रात अपवादात्मक कार्य करणाऱ्या संस्थेला हा पुरस्कार दिला जातो. संस्था पुर्णतः शासनाच्या निधीवर अवलंबून नसावी. बालकल्याण क्षेत्रात किमान १० वर्षे सातत्यपूर्ण उत्कृष्ट कार्य करणारी असावी.**

बाल शक्ती पुरस्कार सन २०२४ करीता केंद्र शासनाने अर्ज मागविलेले आहे. सदरचे अर्ज हे www.awards.gov.in या संकेतस्थळामार्फतच ऑनलाईन पद्धतीने स्विकारले जाणार आहेत. सदर पुरस्कारांची माहिती सदरच्या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१/०८/२०२३ पर्यंत आहे.

सही/-
**(शोभा शेलार)**
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
मुंबई

डीजीआयपीआर/२०२३-२४/२९५२

## पश्चिम रेल्वेमार्गावर उद्या 'नाईट ब्लॉक'

**मुंबई :** ट्रॅक, सिग्नलिंग यंत्रणा आणि ओव्हरहेड उपकरणांच्या देखभालीसाठी, पश्चिम रेल्वेतर्फे रविवार, दि. २० ऑगस्ट रोजी बोरिवली आणि भाईंदर स्थानकांदरम्यान अप धीम्या मार्गांवर आणि डाऊन फास्ट मार्गांवर रात्री १२.४० ते पहाटे ४.४० वाजेपर्यंत चार तासांचा 'जंबो ब्लॉक' घेण्यात येणार आहे. अप धीम्या मार्गावरील सर्व गाड्या विरार/वसई रोड ते बोरिवलीदरम्यान अप जलद मार्गावर आणि गोरेगाव ते वसई दरम्यान सर्व डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येतील. ब्लॉक कालावधीत वसई रोड/विरार स्थानकादरम्यान डाऊन धिम्या मार्गांवर चालवण्यात येतील. तसेच, रविवारी पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय विभागात कोणताही दिवसकाळी ब्लॉक नसल्याचे पश्चिम रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## मॅनहोलच्या झाकणांवर 'अलर्ट' यंत्रणा

### चोरीचा प्रकार रोखण्यासाठी पालिकेचा नवीन उपाय

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

मुंबईतील मॅनहोलची झाकणे चोरीला जाण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी मुंबई महापालिकेकडून एक नवीन उपाय शोधण्यात आला आहे. मॅनहोलचे झाकण उघडताच सायरन वाजेल, अशी यंत्रणा बसवण्यात येत असून, येत्या दहा दिवसांत प्रायोगिक तत्त्वावर १४ ठिकाणी ही यंत्रणा कार्यान्वित करण्याचे करण्यात येणार असल्याची माहिती पालिकेच्या एका अधिकाऱ्याने दिली आहे.

नुकतेच मुंबई उच्च न्यायालयाकडून उघड्या मॅनहोलबाबत मुंबई महापालिका प्रशासनाला खडसावण्यात आले होते. त्यानंतर आता मॅनहोलची झाकणे चोरीला जाण्याचे प्रकार बंद व्हावेत, यासाठी 'अॅलर्ट' देणारी सायरन यंत्रणा बसवण्याचा निर्णय पालिकेकडून घेण्यात आला आहे. पालिकेच्या मलनिस्सारण विभागाकडून ही नवी यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे.

- **'जी दक्षिण' प्रभाग; वरळीतील बीडीडी चाळ येथील दोन ठिकाणे**
- **बाळूशेठ मादूरकर मार्ग येथील एक ठिकाण**
- **'एफ दक्षिण' प्रभाग; परळमधील जेरबाई वाडिया रोड येथील तीन ठिकाणे**
- **शिवडी क्रॉस रोड येथील दोन ठिकाणे**
- **शिवडीमधील डी. जी. महाजनी मार्ग येथील दोन ठिकाणे**
- **'ई' प्रभाग; त्रिंबक परशुराम लेन येथील एक ठिकाणे**
- **'सी' प्रभाग; एम. एस. अली रोड येथील एक ठिकाणे**
- **'डी' प्रभाग; तुळशीवाडी रोडमधील भानजीभाई राठोड रोड येथील एक ठिकाण**
- **'जी उत्तर' प्रभाग; बापूराव परूळेकर मार्ग येथील एक ठिकाणे**

## बीडीडी चाळीतील दुकानधारकांच्या पात्रतेसाठी नवे पुरावे

**मुंबई, दि, १८ : प्रतिनिधी**

वरळी, नायगाव, ना. म. जोशी मार्गावरील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम वेगाने सुरू आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी राज्य सरकारने बीडीडी चाळींमधील दुकानांची पात्रता निश्चिती करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी जाहीर केली आहे.

सक्षम प्राधिकारी यांनी पात्रतेसाठी मुंबई महानगर पालिकेची दंड पावती, मुंबई महानगरपालिकेची सर्वेक्षण पावती, मुंबई महानगर पालिकेने दुकानदाराला बजावलेली नोटीस, जिल्हाधिकारी, मुंबई कार्यालयाने दुकानदाराला बजावलेली नोटीस, मुंबई विकास विभाग चाळी संचालक/व्यवस्थापक यांची दंड पावती, मुंबई विकास विभाग चाळी संचालक/व्यवस्थापक यांच्या अभिलेखातील दुकान नियमित केलेल्या आदेशाची प्रत यापैकी तीन पुरावे पात्रतेसाठी सादर करावे लागणार आहेत किंवा अनिवासी झोपडीचा दुकानाच्या क्रमांकाचा उल्लेख असलेला अथवा बीडीडी चाळीतील ठिकाण दर्शविणारा मुंबई महानगरपालिकेचा दि. १ जानेवारी २००० अथवा त्यापूर्वीचा गुमास्ता परवाना, खानावळ परवाना, उपहारगृह परवाना यांबाबत भरण्यात आलेल्या कराची पावती आवश्यक आहे.

**पश्चिम रेल्वे**
**शुद्धिपत्रक**

**निविदा सूचना क्र. ईएल/मेंट/१६६/१३८/डब्ल्यूए/३ दिनांकित २६.०७.२०२३ साठी मुंबई विभाग: ०१ वर्ष कालावधीसाठी विविध स्थानकांच्या ठिकाणी एस्कलेटर्स आणि लिफ्टसचे मॉनिटरिंग आणि प्रचालन शुद्धिपत्रक जारी करण्यात आले आहे. देय दिनांक १८.०८.२०२३ रोजी १५:३० वा. होते ते कृपया तांत्रिक कारणांमुळे रद्द करण्यात आल्याचे समजावे.** 0532

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

**मध्य रेल्वे**
**निविदा सूचना क्र. डीआर.एन.सी.एस आणि टी. निविदा २०२३.०७ दिनांक: १७.०८.२०२३**

**कामाचे नाव ठिकाणासह:** मध्य रेल्वेच्या मुंबई विभागामधील एमयूटीपी फेज II अंतर्गत सीएसएमटी – सीएलए ५ व्या आणि ६ व्या लाईन च्या संदर्भात लोकमान्य टिळक टर्मिनस आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे टेलीकॉम पॅसेंजर सुविधेची तरतूद. **कामाचे अंदाजे मूल्य:** रु. ३,७६,७४,६४६.६२/- **बोली सुरक्षा:** रु. ३,३८,४००.००/- **निविदा समाप्तीकरीता दिनांक आणि वेळ:** २२.०९.२०२३ रोजी १५.०० वा. **निविदा उघडण्यासाठी दिनांक आणि वेळ:** २२.०९.२०२३ रोजी १५.३० वा. संकेतस्थळ तपशिल आणि सूचना फलक ठिकाण जेथे पूर्ण तपशील पाहता येईल. संकेतस्थळ **www.ireps.gov.in** आणि उप मुख्य संकेत आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम), मध्य रेल्वे, टिळक ब्रिज जवळ, दादर, मुंबई ४०००२८. शुद्धिपत्रक जर असल्यास केवळ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**उप मुख्य संकेत आणि दूरसंचार अधिकारी (बांधकाम), दादर**
VAPL/407
**तिकिटासाठी UTS APP डाउनलोड करा**

**ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED**
CIN: L74110MH1992PLC367633
Reg Office: 1205-1206, 12th Floor, Raheja Chambers, 213, Free Press Journal Marg, Nariman Point, Mumbai MH 400021. E-mail: 1connect@1gsp.in • website: www.1gsp.in

**NOTICE OF 31ST AGM FOR ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED TO BE HELD THROUGH VIDEO CONFERENCING / OTHER AUDIO VISUAL MEANS**

Notice is hereby given that the 31st (Thirty First) Annual General Meeting of the members of One Global Service Provider Limited (Formerly Known As Overseas Synthetics Limited) will be held on Monday, 11th September, 2023, AT 2:00 P.M. IST through video conferencing / other audio visual means (VC) to transact the businesses as set out in the AGM. The electronic copies of the Notice of AGM and Annual Report for F.Y. 2022-23 have been sent to all the members whose email Ids are registered with the Company/Depository Participant(s) in accordance with the circulars issued by Ministry of Corporate Affairs. The same is also available on the Company's Website.

Members holding shares either in physical form or in dematerialized form, as on the cut-off date of Friday, September 01, 2023 may cast their vote electronically on the Ordinary Business as set out in the Notice of AGM through electronic voting system of NSDL from a place other than venue of AGM ("remote e-voting").All the members are informed that:
• The Ordinary Business as set out in the Notice of AGM may be transacted through voting by electronic means. • The remote e-voting shall commence on Friday, September 8th, 2023 (9:00 a.m. IST) • The remote e-voting shall end on Sunday, September 10th, 2023 (5:00 p.m. IST) • The cut-off date for determining the eligibility to vote by electronic means or at the AGM is Friday, September 01, 2023. • The Register of Members and Share Transfer Books will remain closed from 5th September, 2023 to 11th September, 2023.
• Any person, who acquires shares of the Company and become member of the Company after dispatch of the Notice of AGM and holding shares as of the cut-off date i.e. Friday, August 11, 2023, may obtain the login ID and password by sending a request at following email id's: evoting@nsdl.co.in or issuer/RTA.

**Members may note that:**
**01)** The remote e-voting module shall be disabled by NSDL after the aforesaid date and time for voting and once the vote on a resolution is cast by the member, the member shall not be allowed to change it subsequently;
**02)** The members who have cast their vote by remote e-voting prior to the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their vote again;
**03)** A person whose name is recorded in the register of members or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off date shall be entitled to avail the facility of remote e-voting. The notice of AGM is available on the Company's website http://www.1gsp.in/and also on the NSDL's website www.evoting.nsdl.com; and in case of queries, members may refer to the Frequently Asked Questions (FAQs) for members and e-voting user manual for members at the Downloads Section of www.evoting.nsdl.com, or email at evoting@nsdl.co.in, Tel: 1800-222-990 or contact Ms. Megha Chitre, Company Secretary and Compliance Officer of the company, at 1connect@1gsp.in, Contact No: 8758706408 who will also address grievances connected with the voting by electronics means.

Date : 17.08.2023
Place : Mumbai

For, **One Global Service Provider Limited**
(Formerly known as Overseas Synthetics Limited)
Sd/-
**Megha Chitre**
Company Secretary and Compliance Officer

## विकसित राष्ट्र बनवण्यासाठी उद्दिष्टे निर्धारित करा

### राज्यपालांच्या राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाला सूचना

**मुंबई, दि. १८ : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाने पुढील २५ वर्षांकरिता आपली उद्दिष्टे निर्धारित करण्याची सूचना राज्यपाल रमेश बैस यांनी केली.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या समारोप पर्वानिमित्त आयोजित 'मेरी माटी, मेरा देश' या अभियानाची सांगता राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी राजभवन येथे झाली. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, मुख्य सचिव मनोज सौनिक, प्रधान सचिव विकास खारगे, पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंह आदी उपस्थित होते. यावेळी टपाल खात्यातर्फे शहाजी राजे भोसले यांच्यावरील टपाल तिकिटाचे प्रकाशन करण्यात आले. सांस्कृतिक कार्य विभागातर्फे 'महाराष्ट्रातील समाज सुधारक व विचारवंत' हे मराठी पुस्तक आणि 'स्वतंत्रता संग्राम में महाराष्ट्र का योगदान' या हिंदी पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. 'साद सह्याद्रीची, भूमी महाराष्ट्राची' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे यावेळी सादरीकरण करण्यात आले.

“शिवकालीन जलदुर्गांचे जतन व संवर्धन करण्याचे तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जतन करण्याचे काम शासनातर्फे केले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वप्नातला महाराष्ट्र साकार करण्याचे तसेच विकासाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न शासन करीत आहे.

– **एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र

“छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यारोहणाच्या ३५०व्या वर्षानिमित्त राज्य शासनातर्फे प्रत्येक जिल्ह्याचे गॅझेटिअर तयार करणार आहोत. येत्या वर्षभरात छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित १२ टपाल तिकिटांचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

– **सुधीर मुनगंटीवार,** सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र